|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University , Jalgaon

## राष्ट्रीय सेवा योजना कक्ष

जा.क्र. कबचौउमवि/१४-क/रासेयो-विशि/३७०/२०२५ दि. १९/११/२०२५

**प्रति,**

मा. प्राचार्य / संचालक/विभाग प्रमुख,

राष्ट्रीय सेवा योजनेचे शासन अनुदानित व स्वंयनिर्वाहित एकक असलेले महाविद्यालये,

मान्यता प्राप्त परिसंस्था व शैक्षणिक प्रशाळा-विभाग यांना...

**विषय :-** राष्ट्रीय सेवा योजना सात दिवसीय विशेष शिबीर आयोजन **शिबीर संकल्पना (थिम)** बाबत ..

**संदर्भ :- १** ) जा.क्र. कबचौउमवि/१४-क/रासेयो-विशि/३६१/२०२५, दि. १४/११/२०२५

२) जा.क्र.रासेयो-२०२५/ प्र.क्र.१११/ रासेयो कक्ष, दि.१९/११/२०२५ चे ई-पत्र

**महोदय / महोदया,**

उपरोक्त संदर्भीय क्र०१ अन्वये आपणास केंद्र शासनाचे क्रीडा व युवक मंत्रालय , भारत सरकार व महाराष्ट्र राज्य शासनाचे उच्च व तंत्र शिक्षण विभाग, रासेयो कक्ष,मुबंई यांच्या निर्देशानुसार शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता आपल्या राष्ट्रीय सेवा योजना एककांनी दत्तक गावामंध्ये सात दिवसीय विशेष शिबीरांचे आयोजन करण्या संदर्भात परिपत्रक रासेयो कक्षा मार्फत निर्गमित करण्यात आलेले आहे. तसेच शासन निर्देशपत्रान्वये विशेष निवासी शिबीराची **शिबीर संकल्पना (थिम) " Youth for sustainable development with special focus on watershed management and wasteland development" ( शास्वत विकासाठी युवक : पाणलोट व्यवस्थापन आणि पडीत जमिन विकासावर विशेष भर )** अशी असून आपल्या शिबीरात सदर संकल्पनेची अमंलबजावणी करण्यात यावी.

प्रस्तुत अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आपल्या एककाच्या सात दिवसीय विशेष श्बिाराचे आयोजन करतांना शासन निर्देशित पत्रान्वये " **Youth for sustainable development with special focus watershed management and wasteland development" ( शास्वत विकासाठी युवक : पाणलोट व्यवस्थापन आणि पडीत जमिन विकासावर विशेष भर )** या शिबीर संकल्पनेवर (थिम) आयोजन करण्यात यावे. तसेच विशेष शिबीराच्या दिनचर्येमध्ये केंद्र व राज्य शासनाच्या कृती आराखडयानुसार उपक्रमाचा समावेश करावा.

**कळावे- धन्यवाद !**

**आपला विश्वासू,**

( प्रा. व्हि. एम. रोकडे )
संचालक, राष्ट्रीय सेवा योजना

**** मा. राज्यपाल महोदयांच्या निर्देशान्वये दत्तक गावा मध्ये खालील उपक्रमांचे प्राध्यान्याने आयोजन करण्यात यावे.***

१.स्वच्छता मोहिम राबवून गाव स्वच्छ करणे व गावकऱ्यांना स्वच्छतेबाबत जनजागृति करणे.२. नशामुक्ती अंतर्गत गावकऱ्यांना नशेमुळे होणाऱ्या दुष्परीणाम या विषयी जनजागृति करणे. ३. वन संवर्धन हि काळाची गरज आहे, पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षलागवड कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.४.युवकांना नेतृत्व गुण, व्यक्तीमत्व विकास व जबाबदार नागरीक बनविण्यासाठी गावातील युवकांसाठी प्रेरणादायी तज्ञ व्याख्यात्यांचे व्याख्यान आयोजीत करण्यात यावे, चर्चासत्रे, पथनाटय ज्यामध्ये प्रामुख्याने चारीत्र्यवान युवक /युवती, प्राकृतिक शेती व इतर मुल्यांचा अंतर्भाव असावा.

**टिप** :- बॅनर व कार्यक्रम पत्रिकेवर **शिबीर संकल्पना (थिम)** आणी माय भारतचा लोगो दर्शविण्यात यावा.

**प्रतिलिपी:-** जिल्हा- विभागीय रा.से.यो. समन्वयक, कृपया पत्रकातील सुचनेप्रमाणे कार्यवाही होण्यासाठी संबधीतांना प्रेरीत करावे.

**प्रत :-** १) मा. राज्य संपर्क अधिकारी / विशेष कार्य अधिकारी उच्च व तंत्र शिक्षण विभाग, रा.से.यो.मंत्रालय कक्ष, मुंबई.
२) मा. विभागीय संचालक, रा.से.यो. विभागीय संचालनालय, कृषी महाविद्यालय परीसर, शिवाजीनगर पुणे ३) विभागप्रमुख, कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव ४) विभागप्रमुख, प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव ५) विभागप्रमुख, कुलसचिव कार्यालय, कबचौउमवि, जळगाव ६) विभागप्रमुख, वित्त विभाग, कबचौउमवि, जळगाव ७) मा. जनसंपर्क अधिकारी, कृपया मजकूरास प्रसिध्दी द्यावी. ८) पध्दती विश्लेषक, संगणकशास्त्र प्रशाळा, कबचौउमवि, जळगाव कृपया मजकूरास संकेतस्थळावर प्रसिध्दी द्यावी.